# 'रयत'ने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे : खा. शरद पवार

**सातारा**, दि. ४ : कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यावेळी वेगळी शिक्षणप्रणाली होती. या परिस्थितीत 'रयत' ने जगातील बदलांची नोंद घेऊन, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे, असे मत रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेची खा.शरद पवार यांनी ५० वर्ष सेवा केली. त्या पार्श्वभूमीवर सातारा येथील जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. खा. श्रीनिवास पाटील, आ. दिलीप वळसे-पाटील, आ. शशिकांत शिंदे, आ. मकरंद पाटील, आ. बाळासाहेब पाटील, रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील,



**बोलताना खा. शरद पवार. व्यासपीठावर डॉ. रघुनाथ माशेलकर, खा. श्रीनिवास पाटील, डॉ. अनिल पाटील व मान्यवर.**

व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, सचिव विठ्ठल शिवणकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खा. शरद पवार म्हणाले, मी शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील हे माझ्या वडिलांना भेटायला आले होते. त्यांनी माझ्याविषयी चौकशी केली. कर्मवीर आणि माझ्या वडिलांची चर्चा झाल्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाहू महाराज यांच्या नावाने हायस्कूल काढण्याचे निश्चित केले. ते 'रयत' चेच हायस्कूल होते. मी तिथे न रमल्यामुळे मला माझ्या बंधूंकडे नगर येथे शिक्षणासाठी पाठवण्यात आले. त्या ठिकाणीही मी 'रयत'च्याच हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. 'रयत'ने आज सर्वसामान्य मुलांसाठी शिक्षणाची कवाडे खुली करून दिली आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. आज रयतचा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. दुसरीकडे शिक्षण पद्धतीत काळाबरोबर बदल करणे गरजेचे आहे. उद्योग, संशोधन, आरोग्य, शिक्षण यासह अन्य क्षेत्राला विज्ञानाचा आधार आहे. कृत्रिम बुद्धीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत आहे. नवनवीन ज्ञान संपादन करण्यासाठी रयतने विद्यार्थ्यांना कवाडे खुली करून द्यावीत. 'रयत'च्या माध्यमातून नवनवीन शिक्षण प्रणाली अवलंबण्यासाठी अनेकांशी चर्चा सुरू आहे, असे खा. शरद पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

रघुनाथ माशेलकर म्हणाले, 'रयत'चे रोपटे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लावले असले तरी त्याचा वेलू गगनावर नेण्याचे काम शरद पवार यांनी केले. १९९० साली **(पान ७ पहा)**

## 'रयत'ने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे : खा. शरद पवार

शरद पवार यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले होते. शिक्षणाला विज्ञानाचे अधिष्ठान असणे गरजेचे आहे, असा त्यांचा हट्ट होता. विज्ञानामध्ये समाज परिवर्तनाची ताकद आहे, हे त्यांनी जाणले होते. यापूर्वीच्या काळात संगणक शिक्षित आणि अशिक्षित असे दोन गट होते. शिक्षणात ज्ञान संवर्धनासह मूल्य संवर्धन आवश्यक आहे, असा त्यांचा आग्रह असे. खा. शरद पवार यांचे वाचन अफाट असून ते प्रत्येक पुस्तकात गुरू शोधतात. शरद पवार यांच्या माध्यमातून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यास मदत झाली, असेही त्यांनी यावेळी नमूद केली. खा. श्रीनिवास पाटील म्हणाले, शरद पवार यांनी माझ्यासारख्या व्यक्तीला खासदार, राज्यपाल केले. ते नेहमीच माझ्या बाजूला डाव्या बाजूस असतात. सातारा येथील जिल्हा परिषद मैदानावर लोकसभेच्या निवडणुकीची झालेल्या सांगता सभेतही ते माझ्या डाव्या बाजूला होते. आज माझ्या मित्राचा गौरव होतो, ही बाब माझ्यासाठी खूप आनंददायी आहे.

**रामशेठ ठाकूर यांच्याकडून पाच कोटी रुपयांची मदत**

रयत शिक्षण संस्थेच्या कमवा व शिका या योजनेच्या माध्यमातून रामशेठ ठाकूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. कष्ट करून आज ते उद्योगपती झाले आहेत. आपण ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेतो त्याच्याशी बांधिलकी ठेवत आज त्यांनी रयत शिक्षण संस्थेला पाच कोटी रुपयांची मदत दिली. पाच कोटी रुपयांचा धनादेश शरद पवार यांच्याकडे दिला.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.